# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


<u>महत्त्वाचे</u>

क्रमांक: १०/एडीएम/पदविका/२०१८/ १०८५

दिनांक : 24 AUG 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपुर

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करण्याची तसेच प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने इतर बाबीबाबत...**

**संदर्भ:-** या संचालनालयाचे पत्र क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१८/१००८ दि. २०.०८.२०१८.

वरील विषयाबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक (cut off date) ३१.०८.२०१८ निश्चित करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने खालील बाबी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

१. प्रवेशाचा अंतिम दिनांक ३१.०८.२०१८ निश्चित करण्यात आलेला असल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत (uploading) करण्याकरिता अंतिम दिनांक ३१.०८.२०१८ (सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) प्रवेशाचा अंतिम दिनांक म्हणुन निश्चित करण्यात येत आहे.

२. प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक विचारात घेऊन प्रवेश रद्द करण्यासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना मुळ कागदपत्रे व शुल्क परताव्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फेरीनंतर रिक्त असलेल्या व संस्थास्तरावरील रिक्त जागेवर प्रवेश मिळण्यासाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्यासाठी, प्रवेश अर्ज नोंदणी (Registration for Non-CAP admission) चा अंतिम दिनांक सुध्दा सुधारित अंतिम दिनांकानुसार दि. ३१.०८.२०१८ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येत आहे.

(डॉ.अभय वाघ)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत:- कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई, माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी